# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/2449 दिनांक : ०५.११.२०२०

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टलवर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीबाबत...**

संदर्भ : - १. मा. संचालनालयाद्वारे ईमेलद्वारे प्राप्त प्रलंवित विद्यार्थ्यांची यादी
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/२०७०
दि. ०६.१०.२०२०.
३. मा. संचालनालयाद्वारे ईमेलद्वारे प्राप्त नवीन यादी दि. ३.११.२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांना अधिक माहितीसाठी सर्व योजनांबाबत महाडीबीटी पोर्टलवर पात्रता नियम, व्हीडीओ, मॅन्युअल, परिपत्रके पाठवून तातडीने कार्यवाही करण्याबाबत दूरध्वनीद्वारे संपर्क साधून सर्व विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ आणि २०१९-२० या दोन्ही वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीकरीता अर्ज केले होते. त्यापैकी ज्या पात्र विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली नाही. त्या विद्यार्थ्यांची जिल्हा-तालुका-महाविद्यालयनिहाय मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमधील यादी सोबत जोडण्यात आली आहे. तरी सदर विद्यार्थ्यांचे / महाविद्यालयांचे / संस्थांचे / विद्यापीठांचे शिष्यवृत्ती जमा न होण्याचे कारणे आहेत जी सदर विद्यार्थ्यांच्या नावासमोरील Reasons due to which amount is undisbursed (I Instalment Student) आणि Reasons due to which amount is undisbursed (II Instalment Student) या कॉलममध्ये सविस्तरपणे नमूद करण्यात आलेली आहेत.

तरी सोबत जोडलेल्या यादीमधील सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी यादीमध्ये नमूद सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त नमूद कॉलममधील प्रलंबित रहाण्याच्या कारणानुसार आपल्या स्तरावरुन योग्य ती पूर्तता करणेबाबत सूचना द्याव्यात. सोबत जोडलेल्या यादीमधील सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी यादीमध्ये नमूद विद्यार्थीनिहाय प्रलंबित रहाण्याची कारणे यांची पूर्तता आपल्या स्तरावरुन देखील करण्यात यावी. सदर प्रलंबित कारणांची पूर्तता तातडीने केल्यास प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम डीबीटी प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये लवकरात लवकर जमा करण्यात येईल. संदर्भ क्र. २ अन्वये यापूर्वी शिष्यवृत्ती प्रलंबित राहीलेल्या विद्यार्थ्यांची यादी पाठविली असून त्यावर अद्यापपावेतो काय कार्यवाही झाली त्याबाबतचा सविस्तर योजनानिहाय अहवाल तयार करावा आणि सदर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर पूर्तता न करण्यात आल्याने एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.